महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001
e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र. नाविमं/उमागो/2677
नागपूर दि. 23/08/2024

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग.

विषय:– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै/ऑगस्ट 2024 च्या निकालानंतर उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी, छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाबाबत.
संदर्भ:– राज्य मंडळ प्रकटन क.रा.मं./परीक्षा–2/3317, पुणे दिनांक 22/08/2024

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै/ऑगस्ट 2024 ला प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना संपादित गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायाप्रत तसेच उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकनाची संधी उपलब्ध राहणार आहे. सदर संधीबाबत खालीलप्रमाणे माहिती नमूद करण्यात येत आहे. या परीक्षेच्या ऑनलाईन निकालानंतर खाली दर्शविलेल्या तारखांनुसार **गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेची छायाप्रत प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार असून त्यासाठी भरावयाचे विहित शुल्क,अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

ऑनलाईन साठी संकेतस्थळ इयत्ता 12 वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांनी अर्ज करावा. या प्रकियेसाठी विहित शुल्क **(Debit card/credit card/UPI/Net Banking)** या द्वारे ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहे.

| अ.क. | तपशिल | कालावधी | शुल्क प्रती विषय |
|---|---|---|---|
| 1 | गुणपडताळणी | **24/08/2024 ते 02/09/2024** | रु. 50/– |
| 2 | उत्तपत्रिकाची छायाप्रत | **24/08/2024 ते 02/09/2024** | रु. 400/– |
| 3 | पूनर्मूल्यांकन | उत्तरपत्रिका छायाप्रती प्राप्त झाल्यावर कार्यालयीन कामाच्या 05 दिवसाच्या आत | रु. 300/– |

**उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनबाबत:–**

उत्तरपत्रिकेची छायाप्रत प्राप्त झाल्यानंतर पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांनी संबंधित विषय शिक्षकांच्या अभिप्रायासह अर्ज करावयाचा असल्याने उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची विहित वेळेत विषय शिक्षकांकडून तपासणी करुन घेण्याची व विषय शिक्षकाचा अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. जेणेकरुन विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाच्या सुविधेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विषय शिक्षकाने त्याच्या जवळच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये संपर्क साधून नमूना उत्तरपत्रिका प्राप्त करुन घ्यावी. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील (इयत्ता 12 वी) गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची छायाप्रत व पुनर्मूल्यांकन करण्याबाबतच्या महत्वाच्या अटी व शर्ती तसेच कार्यपध्दती विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रतिलीपी:–

1. सचिव, राज्यमंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे यांना समादराने माहितीस्तव सादर.
2. विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर यांना समादराने माहिती व उचित कार्यवाहीस्तव प्रत अग्रेषित.
3. शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. भंडारा,चंद्रपूर,नागूपर,वर्धा, गडचिरोली व गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव प्रत अग्रेषित. आपण आपल्या अधिनस्त सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सत्वर लेखी कळवावे.
4. शिक्षणाधिकारी (प्राथ.)जि.प. भंडारा,चंद्रपूर,नागूपर,वर्धा, गडचिरोली व गोंदिया यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव प्रत अग्रेषित. आपण आपल्या अधिनस्त सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सत्वर लेखी कळवावे.